नि. फौजदारी खटला क्र. **१०५३/२०२३**
सरकार विरूद्ध राजकुमार वामन
**निशाणी २७**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबानी**
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : विनोद संपत वानखडे
वय : ४५ वर्षे,
धंदा : शेती,
राहणार : वणी वारूळा, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

घटना सन २०२३ मध्ये घडली. घटना रात्री ०८:०० वाजता घडली होती. मी फाट्यावरून गावाकडे येत असतांना, गाडीच्या चाकातुन दगड उसळला व तो एका व्यक्तिला लागला त्यामुळे आरोपी क्र. २ हिचे असे म्हणणे होते की, तो दगड मी मारला. त्यामुळे आरोपी क्र. १ माझ्या अंगावर धाउन आला व त्याने मला मारहाण केली. त्याच्यामुळे मी जखमी झालो होतो. मला आरोपी क्र. १ याने लाथा—बुक्क्यांनी व काठीने मारले होते. त्यामुळे मी पोलीसांत फिर्याद दिली होती. आता मला फिर्याद दाखवली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर पोलीसवाल्यांनी लिहिला. मी पोलीसांना घटना सांगितली होती. फिर्यादीने फिर्यादवरील सही ओळखुन त्यातील मजकुर पोलीसांना त्याने सांगितले म्हणुन फिर्यादला **निशाणी २८** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखवला. त्यावर देखील माझी सही आहे. पोलीसांनी मला दवाखान्यात पाठवले होते. मी फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी माझे बयान नोंदवले नव्हते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. आर खोखले यांचे मार्फत —**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत माझे जुने वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मला लाथा—बुक्क्यांनी मारहाण केली अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जुन्या वादाच्या कारणावरून मी आरोपींविरूध्द प्रस्तुत खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे विरूध्द आरोपींनी दगड मारल्याच्या कारणावरून पोलीसांत फिर्याद देउ नये यासाठी आरोपींवर दबाव निर्माण करण्यासाठी मी आरोपींविरूध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, माझेविरूध्द फौजदारी प्रकरण दाखल होते. हे म्हणणे खरे नाही की, मला फौजदारी प्रकरणात शिक्षा झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, स्वत:ला

वाचवण्यासाठी पोलीसांत खोटी फिर्याद दिली व आज खोटी साक्ष देत आहे.
**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. १९.०९.२०२५
अकोट